**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी सेमीकॉन इंडिया २०२४ परिषदेचं उद्घाटन.**
2. **चंद्रपूरच्या परिचारिका आशा बावने यांच्यासह देशभरातील १५ परिचारिकांचा राष्ट्रपतींच्या हस्ते 'फ्लोरेन्स नायटिंगेल' पुरस्काराने गौरव.**
3. **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत ३० कोटी रुपये निधी वितरित करण्यास कृषी विभागाची मान्यता.**
4. **चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यातील गणेशपुर इथं शेतात विद्युत प्रवाहाच्या धक्याने चार शेतकऱ्यांचा मृत्यू.**
5. **विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात आज सतर्कतेचा येलो अलर्ट; गडचिरोली, भंडारा आणि गोंदियातील पूरस्थिती नियंत्रणात.**

*********

सेमीकॉन इंडिया

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी सेमीकॉन इंडिया २०२४ या परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले, आजचे युग हे सिलिकॉन डिप्लोमसीचे युग आहे. हा कार्यक्रम योग्यवेळी ठेवण्यात आला आहे. आज भारत सर्वच क्षेत्रांमध्ये जगाला आत्मविश्वास निर्माण करून देत आहे. इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेत 500 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. सेमीकंडक्टर संबंधित पायाभूत सुविधांवर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे. भारतात डेटा सेंटरची मागणी सातत्याने वाढत आहे. ती पूर्ण केली जाईल, अशी ग्वाही पंतप्रधानांनी यावेळी दिली.

फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज  राष्ट्रपती भवनात १५ परिचारिकांना 2024 या वर्षासाठीचे  फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं उल्लेखनीय काम करणाऱ्या परिचारिकांना १९७३ पासून राष्ट्रीय फ्लोरेंस नाइटिंगेल पुरस्कार देण्यास सुरुवात केली.  यावर्षी महाराष्ट्रातील आशा बावणे यांना देखील या पुरस्कारानं गौरविण्यात आलं. सध्या चंद्रपूरच्या सरकारी इस्पितळात कार्यरत असणाऱ्या आशा बावणे मागील २८ वर्षांपासून वैद्यकीय सेवा देत आहेत. यांपैकी २० वर्षे त्यांनी आदिवासी क्षेत्रात सेवा प्रदान केली आहे. डायरियाचा प्रकोप आणि हज यात्रा लसीकरण मोहिमेत त्यांच्या योगदानाची प्रशंसा केली गेली. लसीकरण आणि कोविड  काळात दिलेल्या विशेष सेवेचा गौरव म्हणून आशा बावणे यांना फ्लोरेन्स नाइटिंगेल राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

## सुरक्षा सानुग्रह अनुदान

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत ३० कोटी रुपये निधी वितरित करण्यास कृषी विभागाने मान्यता दिली असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना अपघातात अपंगत्व अथवा मृत्यू आल्यास त्यांना भरपाई देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये सुधारणा करून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मंजूर प्रस्ताव निकाली काढण्यासाठी चालू आर्थिक वर्षामध्ये केलेल्या तरतुदीतून ३० कोटी रुपये इतकं अनुदान वितरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

## अत्याधुनिक इनडोअर स्टेडियम

सन 2036 च्या ऑलिंपिकची तयारी करण्याकरिता केंद्र आणि राज्यशासन खेळाच्या विकासासाठी कटीबद्ध आहेत. ऑलिंपिकमध्ये यश मिळवायचं असेल तर सुसज्ज स्टेडियम असण आवश्यक आहे. त्यासाठीच चंद्रपूर शहरात म्हाडाच्या 16 एकर जागेवर 135 कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक इनडोअर स्टेडियमची निर्मिती करण्यात येत आहे, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. जिल्हा क्रीडा संकूल इथं आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅडमिंटन हॉलचे लोकार्पण करतांना ते बोलत होते. भारताने ऑलिंपिकमध्ये सन 1900 मध्ये भाग घेतला. आज आपला देश हा 140 कोटी लोकसंख्येचा आहे. 2036 मध्ये चंद्रपूरचा खेळाडू जेव्हा ऑलिंपिकमध्ये पदक मिळवेल, तेव्हा खरा आनंद होईल. त्यासाठी खेळाडूंनी मेहनत करावी.आपण खेळाडूंच्या पाठीशी कायम उभे राहू, अशी ग्वाही मुनगंटीवार यांनी दिली.

## गौरी पूजन

विदर्भात आज गौरी पूजन अर्थात महालक्ष्मी पूजन सर्वत्र संपन्न होत आहे. त्यानिमित्त महाप्रसादाचं ठीक-ठिकाणी आयोजन करण्यात आलं आहे. भाद्रपद शुद्ध षष्ठीला अनुराधा नक्षत्रावर गौरींचं आगमन, दुसऱ्या दिवशी सप्तमीला अर्थात आज ज्येष्ठा नक्षत्रावर पूजन आणि अष्टमीला मूळ नक्षत्रावर विसर्जन केलं जातं. ज्येष्ठ नक्षत्रावर पूजा करण्याची पद्धत असल्यामुळे महालक्ष्म्यांना ज्येष्ठागौरी असंही म्हणतात. यात मातीच्या, पितळेच्या मुखवट्यांना सजविलं जातं. खड्यांच्या महालक्ष्मीनां देखील पुजण्याची पद्धत आहे. गणपती उत्सवात हा सण येत असल्याने याला एकत्रितपणे गौरी -गणपती असं देखील संबोधलं जातं.

देवेंद्र फडणवीस/राहूल गांधी

लोकसभेतले विरोधी पक्षनेते, राहूल गांधी यांनी अमेरिकेत दिलेल्या एका मुलाखतीतील काही वक्तव्यांवर  मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. राहूल गांधी हे नेहमीच देशविरोधी विधानं करत  असतात, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी राहूल गांधी आणि  काँग्रेसनं आरक्षणाच्या मुद्यावरुन खोटा प्रचार केला. मात्र आता खरा चेहरा समोर आला आहे, असं ते म्हणाले.

संकेत बावनकुळे

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे यांच्या ऑडी कार ने अपघात केल्याप्रकरणी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी  या प्रकरणावर नागपूरात पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.  गाडीची स्थिति, संकेत बावनकुळे यांचा घटना स्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न, वेळेवर गाडीची माहिती सादर नं होणे, मेडिकलसाठी तीनही लोकांना न पाठवणे, अश्या अनेक बाबींकडे त्यांनी  पत्रकार परिषद घेऊन  लक्ष वेधले. त्यांनी सीताबार्डी पोलीस स्टेशन ला भेट देऊन घटनेची चौकशी ही केली.

चार शेतकऱ्यांचा  मृत्यू

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी इथं प्रकाश राऊत नामक व्यक्तीच्या शेतामध्ये खतांची फवारणी करत असताना तुटलेल्या विद्युत प्रवाहाच्या धक्याने ब्रम्हपुरी तालुक्यातील गणेशपुर इथल्या  चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर  एक शेतकरी जखमी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृतकांमध्ये शेत मालक प्रकाश राऊत, नानाजी राऊत, युवराज डोंगरे, पुंडलिक मानकर यांचा समावेश आहे. तर सचिन नंन्नावरे हा युवक जखमी झाला असून त्याला उपचारासाठी ब्रम्हपुरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलं आहे.  ही  घटना सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. घटनास्थळी पोलिस पथक दाखल झाले असून चौकशी सुरू आहे. वन विभाग देखील तपास करत आहे.

'उत्तरायण-२' 2024 NADT

जागतिकीकरणामुळे सर्वच क्षेत्रात डिजिटल क्रांती घडून आली असून यालाच अनुसरून आयकर आणि करसंकलन क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी बदलत्या काळानुसार नवनवीन तंत्रज्ञान वेळोवेळी शिकत राहण क्रमप्राप्त असल्याचं  प्रतिपादन हैदराबाद येथील नॅशनल अकॅडमी ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्च - नालसार विधी विद्यापीठाचे कुलगुरु प्राध्यापक श्रीकृष्ण देव राव यांनी केलं . नागपूरच्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी,  इथं आयोजित सात आठवडे कालावधीच्या  'उत्तरायण-२' 2024  या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या

प्रशिक्षण वर्गात एकूण 116 अधिकारी असून यामध्ये महिला अधिकाऱ्यांची संख्या 20 एवढी आहे. 18 राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशातून हे अधिकारी सहभागी झाले आहे.

वनभवन

वन आणि वन्यजीवांच संरक्षण आणि संवर्धनाच कर्तव्य बजावित असतांना हौतात्म्य प्राप्त झालेल्या वनअधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्मरणार्थ आज राष्ट्रीय वन हुतात्मा दिनाच्या निमीत्तान नागपूरच्या वन विभागाच्या राज्य मुख्यालयी प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास राव यांच्या अध्यक्षतेत श्रध्दांजली कार्यक्रम पार पडला. सन १७३८ ला राजस्थानातील निसर्ग पुजक बिष्णोई समुदायातील ३६३ गावक-यांनी खेजरली गावातील वृक्षांच्या संरक्षणासाठी केलेल्या बलिदानाची आठवण म्हणून या दिवसाचं स्मरण केलं जातं.

हवामान

भंडारा जिल्हयात दोन दिवसापासून मुसळधार पावसामुळे वैनगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. भंडारा जिल्हयाच्या लाखांदूर तालुक्यातील चूलबंद नदी तीरावर वसलेल्या जुनी बोथली गावाला पुराने वेढा घातला असून चारही बाजूचे रस्ते बंद झाले आहेत. येथील गर्भवतीला गावकऱ्यांनी प्रशासनाच्या मदतीने प्रयत्नपूर्वक बारवा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी दाखल केलं. तर गडचिरोली जिल्हयातील किर्र जंगलात एका इसमाने पूर आलेल्या नाल्याच्या मध्यभागी असलेल्या एका झाडावर दोन रात्री आणि एक दिवस असे ३६ तास काढले. त्याला गावकर्यांनी वाचवून सुटका केल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळविल आहे. गडचिरोलीत सध्या पाऊस थांबला आहे. मागील चोवीस तासांत कुरखेडा तालुक्यात सर्वाधिक ५६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. दरम्यान, गोसेखुर्द धरणातून ४ लाख ९७ हजार क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून, नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असं आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केलं आहे. विदर्भात नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशीम या जिल्हयात आज अनेक ठिकाणी मेघ गर्जनेसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असल्याने हवामान विभागातर्फे सतर्कतेचा येलो अलर्ट जारी केला आहे. दरम्यान आज सकाळ पासून नागपुरात ढगाळ हवामन आहे, यामुळे वातावरणातील उकाडा कायम आहे.

*****